प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०९.१२.२०१९**

**सिडकोतील विभाग प्रमुखांना भेटण्याची वेळ सोमवारी दुपारी २ ते ३**
**नागरिकांच्या सोयीसाठी घेण्यात आला निर्णय**

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. लोकेश चंद्र** यांनी दिलेल्या निर्देशांनुसार नवी मुंबईतील नागरिकांना सिडकोशी संबंधित त्यांचे प्रश्न, समस्या यांच्या निवारणाकरिता सिडकोच्या सी.बी.डी. बेलापूर येथील मुख्यालयातील संबंधित विभाग प्रमुखांना आता दर सोमवारी, सार्वजनिक सुट्ट्या वगळता, दुपारी २ ते दुपारी ३ या वेळेत भेटता येणार आहे. याकरिता अभ्यागतांना (व्हिजिटर) पूर्व वेळ (अपॉईन्टमेन्ट) घेण्याची आवश्यकता नाही.

नवी मुंबईतील तसेच नवी मुंबईतील सिडको प्रशासित नोड्मधील नागरिकांना नागरी, मालमत्ता विषयक समस्या, तक्रारी, प्रश्न आदींच्या निवारणासाठी, त्यांच्या समस्या किंवा प्रश्न मांडण्यासाठी विभाग प्रमुखांना भेटणे गरजेचे असल्यास उपरोक्त दिवशी व वेळेत भेटता येणार आहे. नागरिकांना अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधता येऊन त्यांच्या समस्यांचे लवकरात लवकर निराकरण व्हावे तसेच पारदर्शकता निर्माण होऊन सिडको व नवी मुंबईतील नागरिक यांच्यातील संबंध अधिक दृढ व्हावेत याकरिता हा निर्णय घेण्यात आला आहे.

---

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**